D.A.V. PUBLIC SCHOOL, THANE
2020-2021
FINAL EXAMINATION

STD:VIII **SUBJECT -MARATHI** **MAX MARKS: 80**

DATE: 23/03/21 **TIME- 3HRS.**

सुचना: प्रश्नपत्रिका चार विभागात विभागली आहे .

SECTION –A वाचन विभाग .

SECTION –B **लेखन विभाग .**

SECTION –C **व्याकरण .**

SECTION –D **पाठावरील प्रश्न-उत्तरे.**

सर्व विभाग सोडविणे आवश्यक.

SECTION -A

प्रश्न 1. खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (8)

आत्मविश्वासासारखा दुसरा मित्र नाही. आत्मविश्वास हा भावी उन्नतीचा पाया आहे. आपण म्हणू ते करू शकू अशी स्वतःच्या ठिकाणी श्रद्धा पाहिजे. यानंतर परमेश्वरावर विश्वास ही पुढची पायरी आहे. आत्मविश्वास प्रथम आणि परमेश्वरावरील विश्वास नंतर अशी श्रद्धा आहे. पुराणातल्या तेहतीस कोटी देवावर तुमचा विश्वास असला तरी आत्मविश्वास जर तुमच्याकडे नसेल तर यशस्वी जीवनाकडे जाणारी पाऊलवाटही तुमच्या नजरेस पडणार नाही हे पक्के ध्यानात ठेवा. आत्मविश्वास हाच काय तो तुमचा खरा मित्र आहे. त्याची संगत जोडा, त्याची कास धरा आणि शक्तीमान व्हा.

प्रश्न 1. दुसरा मित्र कोणाला म्हटले आहे? 1

2. भावी उन्नतीचा पाया कोणता? 1

3. स्वतःच्या ठिकाणी कोणती श्रद्धा असली पाहिजे? 1

4. कशाची कास धरून शक्तिमान व्हा असे सांगितले आहे? 2

5.यशस्वी जीवनाकडे जाणारी पाऊलवाट तुमच्या नजरेस कधी पडणार नाही? 2

6. विरुद्धार्थी शब्द लिहा. 1

1. शत्रू 2. यशस्वी

प्रश्न 2.खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (7)

स्वातंत्र्य ही सर्वोच्च देणगी आहे. देव हा तुम्हाला राष्ट्र देऊ शकतो. पण स्वातंत्र्य ही अनोखी देणगी आहे. आपल्याला जर स्वातंत्र्य गमवायचे नसेल तर आपण त्याबद्दल प्रेम व्यक्त करायला हवे. हे प्रेम आपण शब्दांनी आणि कृतींनी व्यक्त केले पाहिजे. मी भारतीय आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. असे नुसते बोलून भागणार नाही. आपल्या मातृभूमीला आपण भूषणावह आहोत का? असा प्रश्न आपणच आपल्याला विचारला पाहिजे? त्यागातून प्रेम व्यक्त होते. आम्ही आमच्या देशासाठी मरायला तयार आहोत का?

प्रश्न 1. स्वातंत्र्य गमवायचे नसेल तर काय करायला हवे असे लेखक म्हणतो? 2

2. देशाबद्धल प्रेम कसे व्यक्त करावे? 2

3. सर्वोच्च देणगी कोणती आहे? 1

4. कशातून प्रेम व्यक्त होते? 1

5. वचन बदला : 1. देणग्या 2. देश 1

SECTION -B

प्रश्न 3.खालील पैकी कोणत्याही एका विषयावर 70 ते 80 शब्दात निबंध लिहा. (8)

1. माझा आवडता सण 2. सूर्य उगवला नाही तर... 3. वीज गेली तर.....

प्रश्न 4.मुद्द्याच्या आधारे कथा लेखन करा - तिला शीषर्क देऊन तिचे तात्पर्य लिहा. (5)

मुद्दे : अनाथ मुलगा -----रोज सकाळी वर्तमानपत्राचे वाटप -----दुपारी शाळेत जाताना रस्त्यात पाकीट मिळणे - प्रामाणिकपणे पोलीस स्थानकावर नेऊन देणे ----पाकिटाच्या मालकाला आनंद ------बक्षीस -नोकरी -तात्पर्य .

किंवा

मुद्दे : एका नदीवर एक अरुंद पूल..... दोन्ही बाजूने एकाच वेळी एक एकेक बोकड येतात.....नदी पलिकडे जाण्यासाठी एकालाच मागे जाणे जरुरीचे दोघेही भांडतात..... पाण्यात पडतात.....थोड्या वेळानंतर..... दोन बकऱ्या येतात..... त्यांनाही पलिकडे जायचे असते..... त्यांना एक युक्ती सुचते..... एक खाली वाकते .....दोन्ही बकऱ्या आपापल्या मार्गाने जातात.....

प्रश्न 5. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (7)

परगावी (बाहेर गावी) गेलेल्या तुमच्या बाबांना त्यांच्या प्रकृतीची चौकशी करणारे पत्र लिहा. (पत्राखाली लिफाफा आवश्यक.)

किंवा

तुमच्या शाळेत प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) कसा साजरा केला याचे वर्णन करणारे पत्र मित्राला लिहा. (पत्राखाली लिफाफा आवश्यक.)

SECTION – C

प्रश्न 6. अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. (6)

1. ती **भरभर** चालत होती.
2. **गणेश** गावाला जात होता .
3. **टेबलावर** पुस्तक ठेवले आहे .
4. **अबब!** केवढा मोठा साप .

5. **मी** उद्या **किंवा** परवा गावाला जाईन.

प्रश्न 7. वाक्यांचे काळ ओळखा **(4)**

1. तू नक्कीच यशस्वी होशील .
2. गीता अभ्यास करते .
3. शिक्षकांना कौतुक वाटले .
4. गणेश चित्र रंगवतो .

प्रश्न 8. समानार्थी शब्द लिहा. **(4)**

1. नाक- 2. किनारा- 3. नदी **-** 4. देव**-** **5** . घर- **6** . आकाश- **7**. उदर- **8**. झाड -

प्रश्न 9. विरुद्धार्थी शब्द लिहा. **(2)**

1. अंधार x 2. प्रश्न x 3. शाप x 4. मूर्ख x

प्रश्न 10. शब्दांचे वचन बदला. **(2)**

1. कळ्या - 2. चित्रे - 3.शाळा - 4. गाव -

प्रश्न 11. शब्दांचे लिंग बदला. **(2)**

1. कुत्रा - 2. मामा - 3. शिक्षक - 4. वडिल -

SECTION – D

प्रश्न 12. खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 5 **)** **(1**5**)**

1. 'बिनभिंतीची शाळा ,लाखो इथले गुरु ,'हा विचार तुमच्या शब्दात स्पष्ट करा .
2. लेखिकेने अनुभवलेली इस्पितळातील प्राण्यांची दुनिया तुमच्या शब्दात लिहा.
3. 'रंगिली पायवाट' शब्दसमूहाचा अर्थ लिहा.
4. 'आभाळाची आम्ही लेकरे,काळी माती आई जात वेगळी नाही, आम्हा धर्म वेगळा नाही' तुमच्या शब्दात अर्थ लिहा.
5. आजि दिवाळी दसरा |सेना म्हणे आले घरा ||भावार्थ लिहा .
6. पोटोबाबद्दलची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे लिहा.
7. 'जिगरबाज भटके' शब्दसमूहाचा अर्थ लिहा .

प्रश्न 13. एका वाक्यात प्रश्नाची उत्तरे लिहा. **(कोणतेही-5)** **(**5**)**

1. माणसाच्या सौदर्यात भर घालणारे कोण आहे ?
2. लेखकाचा कॅनव्हास कोणता होता ?
3. संत सेना महाराजांचा शिण कशामुळे गेला?
4. जनावरांचे इस्पितळ कुठे आहे ?
5. व्यायामासाठी असलेल्या खास ठिकाणाचे नाव काय?
6. जिव्हाताई गप्प का आहे ?

प्रश्न 14. खालील कविता वाचून प्रश्न-उत्तरे लिहा . **(5)**

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगुज कणसांच्या कानी सांगावे हितगुज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी गाळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी.

प्रश्न १ अलगुज कुठे वाजवावी असे वाटत आहे ?

प्रश्न २ हितगुज कोणाच्या कानी सांगावे असे वाटते ?

प्रश्न ३ कोणती फुले शिंपावी वाटतात ?

प्रश्न ४ झुळकेला काय गाळावेसे वाटते ?

प्रश्न ५ समानार्थी शब्द लिहा . १) कुंज २) अलगुज
